॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

Phone : (02462) 229242, 43

Fax : (02462) 215572

ACADEMIC (APPROVAL) SECTION

Website : srtmun.ac.in

E-mail : approval@srtmun.ac.in

# सुधारीत परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या मा.प्राचार्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार **Stage I to II, ALV–11 (AGP-7000)** व **Stage II to III, ALV–12 (AGP-8000)** करीता सेवा अंतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरीता खालील जिल्हानिहाय केंद्रांवरती छाननी समिती (Screening Committee) बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. **पात्र सहाय्यक प्राध्यापकांचे ALV–11 (Stage I to II) व ALV–12 (Stage II to III) चे परिपुर्ण प्रस्ताव खालील प्रमाणे जिल्हानिहाय कॅस कॅम्प केंद्रावर दिनांक २०/०५/२०२६ पर्यंत दाखल करावेत.**

| अनु.क्र. | जिल्हा | कॅस कॅम्प केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | नांदेड | सायन्स कॉलेज, नांदेड. |
| २ | लातूर | महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातुर. |
| ३ | परभणी व हिंगोली | कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी. |

सर्व संलग्नीत महाविद्यालयातील पात्र व इच्छुक शिक्षकांचे स्थाननिश्चिती/पदोन्नतीचे प्रस्ताव जिल्हानिहाय केंद्रावर सादर करण्यापूर्वी UGC Regulation प्रमाणे विविध स्तरावरील पात्रतेचे निकष पूर्ण करणा—या संबंधीत महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यता प्राप्त कार्यरत शिक्षकांचे स्थाननिश्चिती (कॅस) चे प्रस्ताव महाविद्यालयातील IQAC कक्षाकडून योग्य ती छाननी/तपासणी करून पात्र असल्याचा स्वतंत्र अहवाल प्राचार्यांकडे द्यावा. प्राचार्यांनी सदरील अहवालाची प्रत, महाविद्यालयाच्या कव्हरींग लेटरसह प्रस्तावाच्या चार प्रती **प्रत्येक प्रकरण (Stage) करीता रू. २५००/— (रू. दोन हजार पाचशे फक्त) शुल्क भरणा करून जिल्हा निहाय केंद्रावरती सादर करावीत.** संबंधीत जिल्हानिहाय केंद्रानी प्राप्त प्रस्तावाची छाननी (Scrutiny) करावी. विषय तज्ज्ञांच्या नामनिर्देशनासाठी प्रस्तुत विद्यापीठात पात्र शिक्षकांची विषयनिहाय यादी सादर करावी. त्यानंतर संबंधित जिल्हानिहाय केंद्रानी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार स्थाननिश्चिती (CAS) कॅम्पच्या आयोजनाची तारीख निश्चित करून संबंधितांना कळवावे.

संबंधीत महाविद्यलयांनी विद्यापीठ अनुदान आयोग विनियमानुसार CAS अंतर्गत पात्र शिक्षकांचे पदोन्नती/स्थाननिश्चितीचे प्राप्त प्रस्तावाची छाननी समितीने (Screening Committee) सकारात्मक शिफारस केल्यानंतर संबंधीत जिल्हा केंद्र चार प्रस्तावापैकी एक प्रस्ताव विद्यापीठाकडे, व उर्वरीत प्रस्ताव संबंधीत महाविद्यालयास परत करेल.

(पान क्र. ०२ वर पहाने...)

**तसेच प्राप्त आदेशान्वये असेही कळविण्यात येते की, संबंधीत महाविद्यालयांनी जिल्हा केंद्रावरती प्रस्ताव सादर करत असतांना या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र (Format) मध्ये संबंधीत शिक्षकांची आवश्यक ती माहिती भरून त्याची एक प्रत Hard Copy मध्ये व एक प्रत (Soft Copy – World Format) मध्ये प्रस्तावा सोबत सादर करणे अनिवार्य आहे.**

**<u>तसेच जिल्हा केंद्रांनी प्रपत्रात माहिती महाविद्यालयाकडुन संकलीत करून घ्यावी व महाविद्यालयनिहाय Soft Copy (World Format) मध्ये प्रस्तावा सोबत विद्यापीठात सादर करावी.</u>**

'ज्ञानतीर्थ' विष्णुपुरी, नांदेड. §
जा.क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२५–२६/1621 §
दिनांक: ०९/०५/२०२६ §

**सहाय्यक कुलसचिव**
शैक्षणिक (मान्यता) विभाग

<u>प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:</u>

१) **मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, शिक्षकांच्या स्थाननिश्चिती प्रस्तावास विद्यापीठाचे मान्यता पत्र निर्गमित झाल्यानंतर त्यांच्या कडील एक प्रस्ताव मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांच्या कार्यालयाकडे वेतन निश्चितीसाठी देण्यात यावा.**

२) **मा.प्राचार्य,** सायन्स कॉलेज, नांदेड.

३) **मा.प्राचार्य,** कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी.

४) **मा.प्राचार्य,** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातुर.

५) **मा.शिक्षण सहसंचालक,** (उच्च शिक्षण) शिक्षण सहसंचालनालय, नांदेड विभाग, नांदेड.

६) **सिस्टीम एक्सपर्ट,** शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

# CAS – (Name of the College)

| Sr. No. | Name of the Person & Subject | Date of Joining | NET/SET/ Ph.D./M.Phil. | Orientation Course | Refresher Course | Date of Recommended of Committee | Apply of AGP | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | **Name:** (येथे संपुर्ण नाव नमुद करावे)<br><br>Subject:-<br><br>Caste:- (येथे संवर्ग नमुद करावा) तसेच जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र जोडावे.) | **DD/MM/YYYY**<br>विद्यापीठाने नियुक्तीस मान्यता दिलेल्या सर्व पत्रांचा येथे क्रमांक व दिनांकासहीत उल्लेख करावा.<br>(जसे. कंत्राटी, तात्पुरती, नियमित, परिविक्षाधीन व कायम मान्यता) | (प्राप्त केलेल्या पदवीचे नाव, विषय, पदवी प्राप्त केलेला दिनांक, वर्ष, पदवी प्राप्त केलेल्या विद्यापीठाचे नाव) | **DD/MM/YYYY**<br>(येथे कोर्स पुर्ण केलेला कालावधी नमुद करावा.) | **RC/STC/Summer School/etc.**<br>(येथे सर्व कोर्स पुर्ण केलेला कालावधी नमुद करावा.) | **DD/MM/YYYY**<br>(येथे छाननी समितीने शिफारस केलेली तारीख (Due Date) नमुद करावी.) | **Academic Level**<br>(येथे अकॅडमीक लेव्हल नमुद करावी जसे. ALV-11 OR ALV-12) | **AGP-7000**<br>DD/MM/YY<br>(येथे पुर्वीची पदोन्नती मिळालेली तारीख नमुद करावी) लागु असेल तर... |
| | | | | | (येथे सर्व कोर्स पुर्ण केलेला कालावधी नमुद करावा.) | | | |
| | | | | | (येथे सर्व कोर्स पुर्ण केलेला कालावधी नमुद करावा.) | | | |

प्राचार्य
(स्वाक्षरी व शिक्का)

<u>महत्वाची सूचना</u>:
सदर प्रपत्र (Format) ची Soft Copy ही Word Format मध्ये कॅस कॅम्प केंद्रावर सादर करावी व जिल्हानिहाय कॅस कॅम्प केंद्रानी सदर सर्व माहिती एकत्रीत संकलीत करून ती छाननी समितीच्या शिफारशीसह प्रस्तावा सोबत विद्यापीठात सादर करावी.